## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## प्रेस नोट

### दिनांक १०/०८/२०१८

चंदननगर पो. स्टे., गु.र.नं. १६५/२०१८, भा.दं.वि. कलम ४५४, ३८० मधील फिर्यादि नामे श्री. निखील सुरेश ताडीलकर, रा- प्लॅट नं ०३ सरोज सोसा., स नं ४७/३, सुनितानगर जुना मुढंवा रोडजवळ, वडगावशेरी पुणे यांचे राहाते सदनिकेला दि. २५/०६/२०१८ रोजी १३.००वा ते १४.०० वा चे दरम्यान कुलूप लावुन बंद असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने सदनिकेचे दरवाजाचे लावलेले कुलुप तोडुन अंदाजे ११० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम रु. ५,५००/- असा ऐवज घरफोडी चोरी करुन नेलेला आहे वगैरे मजकुराचे दिले तक्रारीवरुन सदरचा गुन्हा दि. २५/०६/२०१८ रोजी दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास करत असतांना मिळालेल्या माहितीप्रमाणे आरोपी नामे मोहमद रिजवान अजमत अली, वय २६ वर्षे, रा. घर नं. ५४८, राजीवनगर, भलस्वा डेअरी, लिबासपुर, उत्तर पश्चिम दिल्ली ४२ यास दिल्ली येथुन व आरोपी नामे दिपक उर्फ दिपु उर्फ अजय सुभाष, वय २७ वर्षे, रा. जी ब्लॉक, गल्ली नं. ८, स्वामी शारदा नंद कॉलनी, भालस्वा डेअरी, दिल्ली यास तिहार जेल येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली. त्याचप्रमाणे आरोपी क्रं. ३ उर्जेद्र छत्रपालसिंह उर्फ राजुमामा, वय ३८ वर्षे, रा. घर नं. ए-२/९२१, भलस्वा जे.जे. कॉलनी, भलस्वा डेअरी, उत्तर पश्चिम नवी दिल्ली यास प्रतापगढ, उत्तर प्रदेश येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली असुन त्याचेकडुन १७ तोळे ४ ग्रॅम वजनाचे रु. ५,१५,०००/- ची किंमतीचे सोन्याचे दागीने / लगड असा मुद्येमाल हस्तगत करण्यात आलेला असुन सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर आरोपीतास मा. न्यायालयासमोर हजर केले असता त्यास दि. १७/०८/१८ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड देण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त सो, परि. ४ - श्री. प्रसाद अक्कानवरू सो, मा. सहा. पोलीस आयुक्त सो, खडकी विभाग- श्री. गणेश गावडे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक - राजेंद्र मुळीक, पोलीस निरीक्षक, गुन्हे – विठ्ठल दरेकर, पोउनि. गायकवाड, पोउनि. भोसले, व कर्मचारी पो.हवा. ३७८४, अजित धुमाळ, पोना. २९९४, तुषार भिवरकर, पोशि. ८३१८, सुभाष आव्हाड, पोना. २९२५, तुषार खराडे, पोना. १९२३, दत्ता शिंदे, पोशि. ७३२४, सचिन कोळी यांनी केलेली आहे.